# जाहिरात नमुना सन २०२२-२३

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यांत येणाऱ्या कार्यक्रमांसाठी प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांचेकडील रिक्त असलेल्या खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (११ महिने २९ दिवसाकरिता) खालील पदासाठी अर्ज मागविण्यात करणेत येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | अनुभव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य परीचारीका तथा पाठयनिर्देशिका | ०१ | १. बी.एस.सी.(नर्सिंग) / शासकिय सेवानिवृत्त सार्वजनिक आरोग्य परीचारीका निर्देशिका<br>२. एमएस-सीआयटी | खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षांपर्यंत व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षांपर्यंत | रु.२०,०००/- | प्रशिक्षणाचा अनुभव आवश्यक | प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर |

वरील प्रमाणे रिक्त असलेल्या निव्वळ कंत्राटी पदासाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येत आहे. तरी इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व छायांकित केलेल्या साक्षांकित प्रतीसह उपरोक्त नमुद केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज करावा. अर्ज दि.१२/०१/२०२३ पासुन ते दिनांक २०/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजेपासुन ते ५.०० वाजेपर्यत (सुटटीचे दिवस वगळून) स्विकारण्यात येतील. अर्ज समक्ष जमा करावेत. तसेच दिनांक २०/०१/२०२३ नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. ई-मेल, पोष्टाद्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर, आर.के.नगर रोड, शेंडा पार्क, कोल्हापूर ४१६०१२

**अटी व शर्ती -**

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवांरासाठी रु १५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी १००/- धनाकर्ष (Demand Draft ) जोडणे आवश्यक आहे. सदरचा धनाकर्ष (Demand Draft) “Principal Health and Family Welfare Training Centre Kolhapur” या नावाने काढावा. धनाकर्ष (Demand Draft ) राष्ट्रीयकृत बॅंकेचा असावा.

२) उपरोक्त नमुद केलेले पद ११ महिने २९ दिवस कंत्राटी तत्वावर कराराद्वारे भरणेत येत आहे. सन २०२३-२४ च्या कृती आराखडयामध्ये सदर पदाची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल. परंतु वरील पद सन २०२३-२४ मध्ये मंजुर झाल्यास पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल.

३) वरील नमुद पद हे राज्य शासनाचे पद नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाचे पद आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

४) सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे क्र.राआसो/मनुष्यबळ/आरक्षण /२४५६४-७७४/१६ दि. २०/०७/२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणा-या आरक्षित सवंर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

५) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

६) उमेदवारांनी सर्व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, तसेच पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून ( १० वी व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसाक्षांकित) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ड ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

७) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

८) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.

९) अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१०) सदर रिक्त पदांच्या संख्येत, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१२) मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधून सादर करावयाचा असल्यास, अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहिल.

१३) अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१४) मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१५) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

सही/-
(डॉ.एस.एफ.देशमुख)
प्राचार्या,
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रः-

पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वतः साक्षांकित करुन लावावा

प्रति,

मा.प्राचार्य,
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर

पदाचे नावः सार्वजनिक आरोग्य परीचारीका तथा पाठ्यनिर्देशिका

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :- ...............................................................

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :- ...............................................................

३) जन्म तारीख :- वर्ष .............. महिना .............. दिवस ............

अक्षरी..............................................

..............................................

वय :- .......... वर्ष पुर्ण, ...........महिने, ........ दिवस

(जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी )

४) राहण्याचा पत्ता :- ...............................................................................

...............................................................................

.............................................................................

(मोबाईल क्र.:- ..........................................) (नमुद करणे अनिवार्य)

(ई मेल आय.डी.:- ..........................................................)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय/नाही जातीचा प्रवर्ग :-.........................

जातीचे नाव :-.............................

➢ अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :-....................

(नमुद करणे अनिवार्य)

७) धनाकर्ष क्रमांक व दिनांक व रक्कम :-

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे / नाही

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशिल (सर्व) | बोर्ड/ विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव :- प्रशिक्षण अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)....................................... २).......................................

३)....................................... ४).......................................

५)....................................... ६).......................................

७)....................................... ८).......................................

९)....................................... १०).......................................

१२) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा अणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेलया सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- कोल्हापूर                स्वाक्षरी :- .......................................

दिनांक :- / /२०२३                अर्जदाराचे नांवः- .......................................